संस्थापक - नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवाकाळ

रोखठोक बेधडक

संपादकीय....

।। न मे भक्त : प्रणश्यति ।।

# तीर्थक्षेत्रे, ज्ञानक्षेत्रे...एक मूक क्रांती

भारतातली अध्यात्मिकता पाहून एका पाश्चात्य तज्ज्ञाने असे म्हटले होते की, इट इज अॅन अननोन सायलेंट अॅंड गेट सिंगींग रिव्होल्यूशन. भारतीय संस्कृती इतक्या शतकानंतरही टिकून राहिली यामागे अध्यात्माच्या माध्यमातून सतत होत असलेली ही मूक सामाजिक क्रांती आहे. तत्त्वज्ञानाच्या आणि बुध्दीच्या पातळीवर या अध्यात्माने हळूहळू खूप बदल घडवले. आणि आता बदलत्या काळानुसार विज्ञानाच्या सहाय्याने हेच बदल वेगाने घडू शकतात.किंवा ते घडवण्याची वेळ आली आहे. याची सुरुवात भारतातल्या तीर्थक्षेत्रांना ज्ञानतीर्थे बनवून होऊ शकते. या एका महत्त्वपूर्ण सिध्दांताचा श्रीगणेशा पंधरा वीस वर्षांपूर्वी पुण्याच्या डॉ. विश्वनाथ कराड यांनी कृतीत आणण्याचा संकल्प केला. ज्यासाठी प्रसिध्द शास्त्रज्ञ रघुनाथ माशेलकर आणि डॉ.विजय भटकर या दोघांनी मूर्तस्वरूप देण्यासाठी सहकार्य केले. संत ज्ञानेश्वर माऊलींनी ज्या श्रीक्षेत्र आळंदीमध्ये संजीवन समाधी घेतली त्याठिकाणी विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या माध्यमातून तीर्थक्षेत्रांच्या स्वच्छतेचा एक वैशिष्ट्यपूर्ण प्रकल्प हाती घेतला. त्या प्रकल्पाच्या पुढच्या टप्प्याचा शुभारंभ माऊलींच्या ७१८ व्या संजीवन समाधी दिनाच्या निमित्ताने अलकापुरीमध्ये हा सोहळा होत आहे. आज शेकडो तीर्थक्षेत्रे अशी आहेत की जिथे स्वच्छता आणि पर्यावरणाचे अधिक सुंदर आणि पवित्र स्वरूप आकाराला येणे गरजेचे आहे. महाराष्ट्राचीच उदाहरणे घेतली तर आळंदी, पंढरपूर, नाशिक या तीर्थक्षेत्रांच्या ठिकाणी जी स्वच्छता आणि पर्यावरणशुध्दता असायला हवी तेवढी दिसून येत नाही. कारण आपण एकतर तीर्थक्षेत्राला फक्त नमस्कार करण्यापुरते जातो. पण या नमस्कारामागचे महत्त्व समजून घेत नाही. कारण या ठिकाणांना तीर्थक्षेत्राचे स्वरूप का प्राप्त झाले, हा इतिहास समजून घेतला तर भक्ती आणि ज्ञानाचा एक विलोभनीय अविष्कार प्राचीन काळात घडून गेलेला असतो. म्हणून ही तीर्थक्षेत्रे ज्ञानक्षेत्रे का झाली पाहिजेत याचे महत्त्व आपोआप लक्षात येऊ शकते. आजच्या माहिती आणि तंत्रज्ञानाच्या युगामध्ये ज्ञानेश्वर, तुकाराम यांनी मांडलेली तत्त्वविचारांची शिदोरी नीट उलगडून पाहिली तर सुख आणि उपभोगाची बुध्दीवर चढलेली पुटे सहजपणे गळून पडतात. कारण समर्पण आणि ज्ञान याचा अनोखा संगम म्हणजेच तीर्थक्षेत्रे असतात. डिव्होशन आणि डिव्हाईन याचे मर्म आपण अधिक गतीने समजावून घेऊ शकतो. सातशे वर्षांपूर्वी ज्ञानेश्वर माऊलींनी पसायदानातून दोन महत्त्वाच्या गोष्टी मागितल्या होत्या. त्या म्हणजे दुरिताचे तिमीर जाओ आणि किंबहुना सर्वसुखी पूर्ण होऊनी तिन्ही लोकी अशाप्रकारची मागणी ज्ञानदेवांनी केली होती.

### डॉ.कराड, माशेलकर आणि भटकरांचा पुढाकार

काहीवेळेला असे वाटते की या दोन गोष्टीच तीर्थक्षेत्राकडून ज्ञानक्षेत्राकडे नेणाऱ्या प्रवासातले संचित आहेत. कोणताही तिमिर नाहीसा होणे याचाच अर्थ प्रकाशाचे त्याठिकाणी अविर्भवन होणे आणि प्रकाश जो येतो तो ज्ञानरुपातच येतो हे लक्षात घेतले पाहिजे. आतापर्यंत जे काही ऋषीमुनी होऊन गेले, संतमहात्मे होऊन गेले या प्रत्येकाच्या जीवनामध्ये आत्मज्ञानाचा प्रकाश आला आणि त्यांनी अज्ञानरुपी तिमिराचा नायनाट केलेला दिसून येतो. ज्या माऊलींनी आपल्या ज्ञानेश्वरीत असे म्हटले आहे की, मोराने अंगभर कितीही डोळे मिरवले तरी त्यातून त्याला दिसत नाही. मोरपिसांवर दिसणारे हे डोळे केवळ त्याचे सौंदर्य वाढवते. पाहण्यासाठी त्याला दोन चर्मचक्षूंचाच उपयोग करावा लागतो. त्याचप्रमाणे मनुष्यालादेखील कोणतेही कर्म करताना ज्ञानाचे आणि भक्तीचे दोन चक्षू असावे लागतात. मात्र ते केवळ चर्मचक्षू न राहता ज्ञानचक्षू झाले पाहिजेत. ज्ञान आणि भक्तीचे चक्षू, ज्ञानचक्षू म्हणून गृहीत धरले जातात. या दोन चक्षूंशिवाय केलेले कोणतेही कर्म यशस्वी होत नाहीत. हा एवढा मोठा सिध्दांत आणि तत्वविचार आपल्यासमोर आहे, अशावेळी या तीर्थक्षेत्रांमध्ये भक्तीचा महापूर वहात असतो. इथे जर का भक्तीआधारित ज्ञानसंकल्पांची सरिता प्रवाहित झाली तर केवढे तरी मोठे कार्य होऊ शकते. साध्य आणि साधना एकत्र होऊन सिध्दांत आकाराला येऊ शकतो. अशा उद्देशानेच आपल्या देशामध्ये असलेली तीर्थक्षेत्रे ही ज्ञानतीर्थे सुध्दा मानली गेली पाहिजेत. त्या दिशेने कार्यही सुरू झालेले आहे. डॉ.कराडांसारख्या तंत्रज्ञ अभ्यासकाला राज्यातली तीर्थक्षेत्रे ज्ञानाचा वारसा सांगणारी आहेत. याचे महत्त्व वाटते आणि याकरता त्यांनी श्रीक्षेत्र आळंदी देहू परिसर विकास समिती अशी संस्थाच स्थापन केली. डॉ.माशेलकर आणि भटकर यांचा सक्रिय सहभाग फार मोलाचा ठरला. एका नव्या सिध्दांताला कृतीरुप देण्यात डॉ.कराड यशस्वी झाले. असे म्हणता येईल.खरे तर आज पंतप्रधान नरेंद्र मोदींनी स्वच्छता मोहीम राबवली आहे. त्यांनी स्वतः गंगेच्या घाटावर जाऊन स्वतः स्वच्छता माहिमेत भाग घेतला. परंतु याच विषयाचे महत्त्व वीस वर्षांपूर्वी कराड यांना जाणवले होते. आणि आपल्या यथाशक्तीनुसार त्यांनी त्याला सुरुवातही केली होती.

### तीर्थक्षेत्र म्हणजे योग्य ठिकाण

ज्याला आपण तीर्थक्षेत्र म्हणतो त्याचा संबंध केवळ भक्ती आणि अध्यात्मिकतेशी आहे असा आपला एक समज होतो. परंतु 'तीर्थ' या शब्दाचा अर्थच 'योग्य ठिकाण' असा होतो. आता योग्य ठिकाण ज्याला म्हणता येते त्या ठिकाणी मनाला आनंद आणि प्रसन्नता लाभते ती लाभायची असेल तर तिथला परिसर प्रसन्न आणि आनंदरुप असला पाहिजे. भक्तीची भावविभोरता खऱ्या अर्थाने तिथे अनुभवता आली पाहिजे. बऱ्याच वेळेला आपण आपल्यापेक्षा वडिलधाऱ्या मंडळींना तीर्थरुप किंवा तीर्थस्वरुप म्हणत असतो. कारण त्यांच्यामुळे अनेक गोष्टींचे ज्ञानसंस्कार आणि आधारही मिळालेला असतो. आणि अशांचाच आपण तीर्थरुप म्हणून आदर व्यक्त करतो. तसाच आदर तीर्थक्षेत्रांविषयी दाखवला पाहिजे. गीतेमध्ये क्षेत्र या शब्दाला शरीर अशी उपमा दिली गेली आहे. आणि हे शरीर जर योग्य ठिकाणी भक्तीच्या माध्यमातून समर्पित झाले तर ते क्षेत्रसुध्दा तीर्थ वाटू शकते. भगवंताने गीतेमध्ये 'मय्येव मन आधस्त्व' असे सांगून तुझे मन माझ्या ठिकाणी लाव अशी सूचना केली आहे. डॉ.कराडांनी अनेकांना बरोबर घेऊन त्यांचे मनही तीर्थक्षेत्रांच्या ठायी लावलेले दिसते. अध्यात्माचा आणि विज्ञानाचा योग्य समन्वय साधला गेला तर एका नव्या आधुनिक ज्ञानपर्वाची अनुभूती घेता येऊ शकते.आळंदीमध्ये तशी माहिती देणारा विश्वमंच उभारून त्याची सुरुवातही झाली आहे. माऊलींच्या संजीवनसमाधी निमित्ताने या उपक्रमाचे औचित्य साधले गेले आहे.